वर्ष १८ वे | अंक १२० | MAHMAR/2006/17212 | रायगड | बुधवार दि.१९ जुलै २०२३ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

www.raigadnagari.com
/ raigadnagari

## येत्या २० जुलैला अंधेरीत मुंबई कॉंग्रेसतर्फे महागाई विरोधात आंदोलन

**दै.रायगड नगरी | मुंबई**

देशामध्ये प्रचंड प्रमाणात वाढलेल्या महागाईने जनता होरपळत असताना त्याकडे दुर्लक्ष करून फक्त सत्तेच्या राजकारणात व्यस्त असलेल्या शिंदे व फडणवीस सरकार आणि केंद्रातील भाजप सरकारच्या विरोधात येत्या गुरुवार दि,२० जुलै रोजी मुंबई कॉंग्रेसतर्फेअंधेरी पश्चिम स्थानकाबाहेर दुपारी ३ वाजता आंदोलन करण्यात येणार आहे.या आंदोलनाची घोषणा मुंबई कॉंग्रेस अध्यक्षा प्रा वर्षा गायकवाड यांनी मुंबई कॉंग्रेसच्या कार्यकारिणी बैठकीत केली.

देशामध्ये महागाई प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे. पेट्रोल, डिझेल, घरगुती गॅस सोबत आता रोजच्या जीवनात लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तू व भाज्यांच्या दरांमध्ये देखील प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे. या प्रचंड महागाईमुळे राज्यातील सर्वसामान्य गरीब जनता होरपळून निघाली आहे. भाज्यांचे दर तर गगनाला भिडले आहेत. आले ४०० रुपये किलो, टोमॅटो १६० रुपये किलो, फ्लॉवर १०० रुपये किलो, लसूण १३० रुपये किलो, कोथिंबिर जुडी २०० रुपये प्रति जुडी, मिरची २०० रुपये किलो, पडवळ ८० रुपये आणि भेंडी ७० रुपये प्रति किलो इतकी महाग झाली आहे.

# अलिबाग जिल्हा रुग्णालयासाठी नवीन अद्ययावत इमारत उभारणार : ना. रवींद्र चव्हाण

**दै.रायगड नगरी | मुंबई**

**अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम सन १९८०–८१ मध्ये करण्यात आले आहे. या इमारतीचे संरचनात्मक परीक्षण सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आले असून त्याची दुरूस्ती आणि पुनर्बांधणी आवश्यक आहे. यामुळे रूग्णालयाची सहा मजल्यांची नवीन इमारत उभारण्याचे शासनाचे धोरण असल्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री रवींद्र चव्हाण यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.**

मंत्री श्री. चव्हाण म्हणाले की, जिल्हा रुग्णालयाच्या जागेतच नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करण्यात आले आहे. महाविद्यालय प्रशासन आणि जिल्हा रुग्णालयात झालेल्या करारानुसार तीन वर्षापर्यंत वैद्यकीय महाविद्यालयाला रुग्णालयातील रुग्णसेवा, पायाभूत सुविधा उपयोगात आणता येणार आहेत.

कराराच्या तीन वर्षानंतर वैद्यकीय महाविद्यालय उसर येथे होईल. तोपर्यंत रूग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

संरचनात्मक परीक्षणानुसार इमारतीचे डागडुजीचे काम सध्या सुरू आहे. इमारतीच्या ५८ खांबांपैकी १७ खांब काढून पूर्णपणे नवीन करण्यात आले आहेत. इतर खांबांचे काम पुढील काळात करण्यात येणार आहे. दुरूस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर सहा मजल्यांची इमारत बांधण्यात येईल, अशी माहितीही मंत्री श्री. चव्हाण यांनी दिली. या चर्चेत सदस्य जयंत पाटील, प्रवीण दरेकर, डॉ.मनीषा कायंदे यांनी सहभाग घेतला.

# सावित्री नदीने गाठली धोकादायक पातळी

## प्रशासनाकडून महाडच्या नागरिकांना सुरक्षितस्थळी जाण्याच्या सूचना

**दै.रायगड नगरी | महाड**

गेल्या काही तासांपासून रायगड जिल्ह्यात कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक नद्या दुथडी भरुन वाहू लागल्या आहेत. रायगड जिल्ह्यातील बहुतांश नद्यांनी इशारा पातळी ओलांडली आहे. या नद्या आता धोकादायक पातळीच्या जवळ पोहोचल्या आहेत. त्यामुळे महाड शहरात पूरस्थिती निर्माण होण्यास सुरुवात झाली आहे. स्थानिक प्रशासनाने नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्याच्यादृष्टीने हालचाली सुरु केल्या आहेत. काहीवेळापूर्वीच महाड नगरपरिषदेने एक संदेश जारी केला आहे.

यामध्ये म्हटले आहे की, महाड शहरातील सर्व नागरिकांना इशारा देण्यात येतो की, सावित्री नदी खोऱ्यात मुसळधार पाऊस पडत आहे. गांधारी व सावित्री नद्यांमधील पाण्याची पातळी सातत्याने वाढत आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी आपल्या सामानासह सुरक्षित स्थळी स्थलांतरीत व्हावे,सतर्क राहावे, अशा सूचना प्रशासनाने दिल्या आहेत.

उत्तर कोकणात आज सकाळपासून जोरदार पाऊस कोसळत आहे. त्यामुळे पुन्हा एकदा कोकणातील महाड व खेड ही दोन्ही शहर पुराच्या भीतीच्या छायेत आहेत. सावित्री नदी इशारा पातळीच्या जवळ असल्याने महाड प्रशासन अलर्ट मोडवर आहे. महाड व पोलादपूरच्या वेळी बाजूला असलेल्या सह्याद्री खोऱ्यात महाबळेश्वर येथेही जोरदार पाऊस सुरू आहे. त्यामुळे महाड शहरात नदीचे पाणी शिरण्याची दाट शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर आजची रात्र महाडवासियांच्यादृष्टीने महत्त्वपूर्ण मानली जात आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास येत्या काही तासांमध्ये नदीचे पाणी शहरात शिरण्याची शक्यता आहे.

# संधीवर स्वार होऊन भवितव्य घडवा : आ.प्रशांत ठाकूर



**दै.रायगड नगरी | पनवेल**

**आलेल्या प्रत्येक संधीवर स्वार होऊन भवितव्य घडवा, असा सल्ला भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना दिला आहे. ते विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यात बोलत होते.**

आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदींमुळे देशाची अर्थव्यवस्था मजबूत होत आहे तसेच त्यांच्या नेतृत्वाखाली नवीन भारत घडत असून प्रत्येकासाठी नवी संधी उपलब्ध होत आहेत. या संधीचा स्वीकार करण्यासाठी सज्ज रहावे.

भारतीय जनता पक्ष विचुंबे, दुर्गामाता मित्र मंडळ, मंगलमूर्ती मित्र मंडळ आणि विचुंबे ग्रामस्थांच्या वतीने दहावी आणि बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा सोमवारी विचुंबे जि.प. शाळेत आयोजित करण्यात आला होता. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या सोहळ्यास भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, पनवेल विधानसभा निवडणूक प्रमुख तथा जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील, विचुंबे भाजप गाव अध्यक्ष के.सी.पाटील, पाली देवद विभागीय अध्यक्ष किशोर सुरते, विचुंबे ग्रामपंचायतीचे उपसरपंच प्रमोद भिंगारकर, मानव अधिकार समितीचे अध्यक्ष शाम पाटील, माजी सरपंच अमिता म्हात्रे, माजी उपसरपंच रवींद्र भोईर, अनुसूचित जाती मोर्चाचे पनवेल ग्रामीण विभागीय अध्यक्ष अविनाश गायकवाड, नयन भोईर, श्री. गणेश, नितीन भोईर, सतीश भिंगारकर, अनिल भोईर, शाम म्हात्रे, अक्षता गायकवाड, नावीत भोईर, चेतन भिंगारकर, प्रेम भिंगारकर, सुदर्शन गोसावी, सुनील पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# तळा बाजारपेठेतील ५५ लाख पाण्यात

## तीन वेळा दुरुस्ती करून देखील रस्त्याची दुर्दशा

**दै.रायगड नगरी | तळा**

**तळा तालुक्यातील मुख्य धमनी समजल्या जाणाऱ्या बाजारपेठेतील रस्त्याची गेल्या महिनाभरापासून पावसाने वाट लावली आहे या रस्त्याला कमी कालावधीत अनेक ठिकाणी खड्डे पडले असून रस्ता उखडला आहे तळा बाजारपेठेत प्रवास करताना प्रत्यक्ष नागरिक आणि वाहनचालकांना मनस्ताप करावा लागत आहे.**

काही महिन्यापूर्वी तळा बाजारपेठेतील कॉंक्रीट रस्त्याच्या कामास सुरुवात करण्यात आली. त्यासाठी मुख्य असणारा या रस्त्यावरून वाहतूक बंद ठेवण्यात आली होती काम पूर्ण झाले परंतु काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्यामुळे काही दिवसांमध्येच या रस्त्याची खडी उखडून त्याला खड्डे पडले. तसेच रस्त्याची लेव्हल चुकल्यामुळे पावसाळ्यात रस्त्यावर पाणी तुंबून राहू लागले व याचा त्रास बाजारपेठेत येणारे नागरिक, वाहनचालक तसेच व्यापाऱ्यांना सहन करावा लागत होता.

तळा नगरपंचायतीवर राष्ट्रवादी कॉंग्रेसची सत्ता आल्यानंतर विकासकामे मंजूर करण्यात आली परंतु विकासकामे पूर्ण करण्यासाठी अनुभवी ठेकेदाराची निवड करण्या ऐवजी तकलादू आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या कार्यकर्त्याला सब ठेकेदार केल्यामुळे या रस्त्याची दुरावस्था झाली असल्याचे बोलले जात आहे या रस्त्याच्या कामामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस मोठ्या प्रमाणात बदनाम झाली असून अनेक प्रकारचे आरोप करण्यात येत असताना आता पुन्हा रस्त्याची दुर्दशा झाली आहे सत्ताधारी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी यावर कोणता उपाय शोधणार यावर संपूर्ण तळा तालुक्याचे लक्ष लागून आहे.

याबाबत मुख्याधिकारी यांच्याकडे सदर रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी करण्यात आली प्रसारमाध्यमांमधून देखील टिकेची झोड उठवण्यात आली बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर मुख्याधिकारी यांनी यामध्ये लक्ष देऊन संबंधित ठेकेदाराला नोटीस बजावून रस्त्याच्या दुरीस्तीचे आदेश दिले. त्यामुळे संबंधित ठेकेदाराने पुन्हा या रस्त्याच्या दुरुस्ती केली तरीही या रस्त्याची दुर्दशा झाली आहे.




## अंजुमन हिमायतुल इस्लाम बशिर एम. हाजवानी सिनियर कॉलेजचे भव्य उद्घाटन



**दै.रायगड नगरी | महाड**

महाड तालुक्यातील अंजुमन हिमायतुल इस्लाम बशिर एम. हाजवानी या सिनियर कॉलेजचे गुरुवार दि.२० जुलै २०२३ रोजी सकाळी १०:३० वा. कॉलेजचे अध्यक्ष मोहम्मद अली इसाने यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रमुख अतिथी मा. बशिर एम. हाजवानी यांच्या हस्ते सिनियर कॉलेजचे उद्घाटन करण्यात येणार असून या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून इम्तियाझा पालकर, डॉ. पफरझाान देशमुख, मुस्तपफा पोंजेकर, झाबेर देशमुख, जाहिद इसाने, मेहमुद जलाल, डॉ. कासिम खोत इ. प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार असून या कार्यक्रमासाठी सर्व मान्यवरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन अंजुमन हिमायतुल इस्लाम कॉलेजचे सी.ई.ओ. अकबर खाजे यांनी केले आहे.


## भाजपनेते किरीट सोमय्या यांचा शिवसेना महिला आघाडीच्यावतीने निषेध



**दै.रायगड नगरी | पनवेल**

भाजपचे नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी व्हिडिओच्या माध्यमातून केलेले कृत्य हे अश्लिल असून, जगासमोर आले आहे. तसेच सोमय्याच्या सेक्स स्कॅंडलच्या तब्बल ३५ व्हिडिओ क्लिप्स व्हायरल झाल्या असून, या स्कॅंडलमुळे महाराष्ट्रात सर्वत्र छी तू केली जात असून, महिला वर्ग अत्यंत तीव्र नाराजी व संताप व्यक्त करीत आहेत.त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेच्या मनात व शिवसैनिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला आहे. भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी आक्षेपार्ह केलेल्या कृत्याची चौकशी करून, योग्य ती कारवाई करावी याकरिता जाहीर निषेध शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) रायगड पनवेल जिल्हाप्रमुख शिरीष घरत नेतृत्वाखाली तसेच शिवसेना महिला आघाडी पनवेल विधानसभा वतीने करण्यात आला.

यावेळी पनवेल उपजिल्हाप्रमुख भरत पाटील, विधानसभा संघटक दिपक निकम, महानगर प्रमुख एकनाथ म्हात्रे, तालुका प्रमुख ज्ञानेश्वर बडे, महानगर संघटक शशिकांत डोंगरे, डी.एन. मिश्रा, उपमहानगर प्रमुख रामदास गोंधळी, शहप्रमुख राकेश गोवारी,सदानंद शिर्के, सूर्यकांत म्हसकर, महिला उपजिल्हा संघटिका कल्पना पाटील, विधानसभा संघटिका रेवती सकपाळ, तालुका संघटिका अनीता डांगरकर, उपतालुका संघटिका मीना सादरे, उपमहानगर संघटिका सौ. रीना पाटील, शहर संपर्क संघटिका रत्नमाला शिंदे, शहर संघटिका सानिका मोरे, रूपाली कवळे, महिला आघाडी पदाधिकारी, शिवसेना, युवासेना, युवतीसेना, महिला आघाडी पदाधिकारी, शिवसेनेचे आजी माजी पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# रोह्यात कुंडलिका नदीने इशारा पातळी ओलांडली

**दै.रायगड नगरी | रोहा**

**तालुक्यात रविवार पासून सलग तीन दिवस दमदार मुसळधार पाऊस झाल्याने रोहा शहरातील कुंडलिका नदीने सोमवारी सायंकाळी इशारा पातळी ओलांडली आहे. या अनुषंगाने नदी लगतच्या गावांना प्रशासना कडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दुसरीकडे पावसामुळे तालुक्यात व शहरात वारंवार वीज पुरवठा खंडित झाला आहे.**

दिवस – रात्र तुफान वादळी वाऱ्यासहित कोसळणाऱ्या मुसळधार पावसाचा शहरी भागा प्रमाणे ग्रामीण भागाला देखील तडाखा बसला आहे. शहरा-तील सखल भागात पावसाचा पाणी साचल्याने अनेक वाहन चालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. मौसमी पावसाने जून अखेर ते जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्या पर्यंत विश्रांती घेतली होती. मात्र काही दिवस विश्रांती घेतल्यानंतर रोहा शहर व ग्रामीण भागात जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून पुन्हा एकदा पाऊस सक्रिय झाला असून दमदार सुरुवात केली आहे. सतत ३ दिवस पडणाऱ्या पावसामुळे शहर व ग्रामीण भागातील नदी, नाले दुथडी भरून



वाहू लागले आहेत. संततधार कोसळणाऱ्या पावसात काहीकाळ जनजीवन ठप्प झाले होते. अधूनमधून वादळी वाऱ्यासहित कोसळणाऱ्या पावसात शहर व ग्रामीण भागात रात्री उशिरा पर्यंत वीज पुरवठा खंडित झाल्याने नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर हाल झाले. शहरातील मुख्य रस्त्यावर विशेषतः हॉटेल रोहा प्राईड समोरील, सावरकर मार्गावर तसेच अनेक ठिकाणी मोठ मोठे खड्डे पडले आहेत.

या खड्ड्यात पावसाचा पाणी साचल्याने वाहन चालक व पायपीट करणाऱ्या नागरिकांना रस्त्याचा अंदाज येत नसल्याने या ठिकाणी लहान मोठे अपघात झाले. खड्ड्यात पडून अनेक जण जखमी झाले असले तरी संबधित प्रशासनाला अद्याप जाग न आल्याने नागरिकांतुन संताप व्यक्त होत आहे.

# मीलेट पाककला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**भरड धान्यापासून बनवलेल्या पदार्थाची पाककला स्पर्धा राबवली तर मिलेट धान्य घरोघरी पोहचेल आणि आपला देश अधिक सुजलाम सुफलाम होईल असे प्रतिपादन जगप्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांनी खारघर येथे आयोजीत पाककला स्पर्धेवेळी केले. भाजप उत्तर रायगड महिला मोर्चाच्या वतीने रविवारी खारघर येथे मिलेट अर्थात भरड धान्य पाककला स्पर्धा आणि मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या स्पर्धेचे उद्घाटन जगप्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर आणि भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्याहस्ते झाले. या पाककला स्पर्धेत चैतन्य शेवाडे यांनी प्रथम क्रमांक पटकावला असून त्यांना उपस्थित मान्यवरांच्याहस्ते पारितोषक देऊन गौरविण्यात आले.**



कोणत्याही पदार्थाची चव ही तो पदार्थ बनविणाऱ्याच्या हाताची असते हे जितके खरे तितकेच हेही खरे की पदार्थ बनविणाऱ्याच्या मनातून ती चव पदार्थात उतरते. पाककला म्हणजे रुचकर, चविष्ट आणि पोषक पदार्थ बनविण्याची कला किंवा शास्त्र आहे. ही कला जमायला या कलेचा गोडी लागायला हवी आणि त्याचा ध्यास घ्यायला हवा, कारण कोणताच पदार्थ एकदा करून त्यात प्राविण्य मिळवता येत नाही. तो जेव्हा पुन्हा पुन्हा केला जातो त्याचवेळी त्यातील बारकावे लक्षात येतात आणि मगच तो प्रत्येकवेळी उत्तमोत्तम बनत जातो.

त्या अनुषंगाने भाजप महिला मोर्चा उत्तर रायगडच्यावतीने मिलेट अर्थात भरड धान्य पाककला स्पर्धा आणि मार्गदर्शन कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. या स्पर्धेत प्रथम क्रमांक चैतन्य शेवाडे, द्वितीय क्रमांक वर्षा शिवणेकर आणि तृतीय क्रमांक कल्पना गुप्ता यांनी पटकावला. सर्व विजेत्यांना मान्यवरांच्याहस्ते बक्षीसे देऊन गौरविण्यात आले. यास्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून ६० हून अधिक पाककला सादर करण्यात आल्या.

यावेळी इंटरनॅशनल शेफ विष्णू मनोहर, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, न्युट्रिशन अंजू प्रसाद, जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, माजी महापौर डॉक्टर कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, वर्षा प्रशांत ठाकूर, केंद्रीय समन्वयक संध्या शारबिद्रे, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, प्रविण पाटील, माजी नगरसेविका अनिता पाटील, हर्षदा उपाध्याय, राजश्री वावेकर, जिल्हा सोशल मीडिया संयोजिका मोना आडवाणी, खारघर मंडळ अध्यक्ष ब्रिजेश पटेल, सरचिटणीस दीपक शिंदे, उपाध्यक्ष दिलीप जाधव, प्रभाकर जोशी, खारघर तळोजा महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, कामोठे महिला मोर्चा अध्यक्ष वनिता पाटील, परीक्षक गौरी जोशी, स्वाती कल्याणकर, सुषमा पोतदार, अंकिता वारंग, कांचन बिर्ला, नीलम विसपुते, शामला सुरेश, सीमा खडसे, सुमित्रा चव्हाण, स्नहेल बोचाई, निर्मला यादव, स्मिता आचार्य, नूतन सिंग, मीनाक्षी अंथवाल, यशोदा रावत, दुर्गा देवी यांच्यासह पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी, मिलेट पदार्थाचे सेवन केल्याने आपण स्वास्थपुर्ण राहू शकतो आणि अनेक व्याधीपासून दूर राहू शकतो असे प्रतिपादन करून अश्याच प्रकारचे उपक्रम राबवावे असे आवाहन केले.

# हिरवळीवरील नवे तारे

कमालीची चुरस आणि अनपेक्षित निकाल यामुळे स्पर्धा लक्षात राहते. रविवारी संपलेल्या विम्बल्डन टेनिस स्पर्धेबाबत हेच म्हणता येईल. स्पेनच्या कार्लोस अल्कराझने सर्बियाच्या नोव्हाक जोकोविचची ऑल इंग्लंड क्लबच्या सेंटर कोर्टवरील मक्तेदारी संपवली, पण त्याआधी २४ तास मार्केता व्हॉंड्रोसोव्हाने जिंकलेले विजेतेपदही कमी महत्त्वाचे नाही. तिने यापूर्वी विम्बल्डन स्पर्धात एकच लढत जिंकली होती. गतवर्षीची स्पर्धा हाताला प्लॅस्टर असताना तिने बघितली होती. अर्थात, अल्कराझचे यश जास्त चर्चेत राहणार. रफाएल नदाल, रॉजर फेडरर आणि नोव्हाक जोकोविच यांनी काही वर्षांपासून पुरुष टेनिस स्पर्धांत हुकूमत राखली. फेडररने २००३ मध्ये विम्बल्डन स्पर्धा जिंकल्यापासून या तिघांनी एकत्रित ६५ ग्रँड स्लॅम जिंकली आहेत. फेडरर गेल्या वर्षी निवृत्त झाला. त्यानंतर नदाल आणि जोकोविचने दहापैकी आठ ग्रँड स्लॅम जिंकल्या. फेडरर-जोकोविच-नदाल यांच्याखेरीज गेल्या वीस वर्षींत केवळ अँडी मरेने ही स्पर्धा जिंकली. या चौघांची कारकीर्द सुरू होत असताना अल्कजराझचा जन्म झाला. तेव्हा तो टेनिसची मूळाक्षरे गिरवत होता. फेडररचा विम्बल्डनमधील सरावस्नेही होत होता. त्याने गतवर्षी अमेरिकन ओपन जिंकली. जागतिक क्रमवारीत वेगाने प्रगती केली. तरीही तो जोकोविचचे वर्चस्व मोडेल, अशी अपेक्षा नव्हती. ते साहजिकच आहे. जोकोविच विम्बल्डनमध्ये जास्त ताकदवान. तो या स्पर्धेत २०१७पासून अपराजित आहे. तो २०१३ मध्ये अँडी मरेविरूद्ध निर्णायक लढतीत पराभूत झाला. त्यानंतर त्याने सेंटर कोर्टवर एकही लढत गमावली नाही. त्यातच पाच आठवड्यांपूर्वी फ्रेंच स्पर्धेत जोकोविचने अल्कराझ हा दडपणाखाली कोलमडतो, हे दाखवून दिले. हे सर्व लक्षात घेता अल्कराझच्या यशाची कोणाला आशा असेल? पण पाच आठवड्यात अल्कराझ केवळ इंग्लिश खाडी ओलांडून आला नाही; तर खडतर लढतींचा सामना कसा करायचा, हेही शिकला. काही टेनिस लढती क्लासिक असतात, तर काही जास्त नाट्य निर्माण करतात. जोकोविच आणि अल्कराझ यांचा अंतिम सामना दुसऱ्या प्रकारातील होता. जोकोविचने पहिल्या सेटमध्ये ५-० अशी आघाडी घेतल्यावर या लढतीत पाच तासांचा कडवा संघर्ष कोणी अपेक्षिला नव्हता. जोकोविच पुन्हा दडपण आणून अल्कराझला धूळ चारण्यास उत्सुक होता. मात्र, अल्कराझने दडपणाचे आव्हान पेलले. स्पेनचे राजे अंतिम लढतीस उपस्थित असूनही तो मानसिक दबावाखाली आला नाही. टेनिस जगतातील सर्वोच्च मानाच्या आणि प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या विम्बल्डनच्या अंतिम सामन्यात शांत खेळ केला. त्याच्या या दुसऱ्या ग्रँड स्लॅम विजेतेपदाची आता जास्त चर्चा होईल. मार्केता गत स्पर्धेत प्रेक्षक होती. तिने खास मैत्रीण मिरियम कोलोदझिएजोवा हीच्या मुख्य स्पर्धेतील पात्रतेचा आनंद घेतला होता. कदाचित, यामुळेच तिचे यापूर्वीचे यश दुर्लक्षित झाले होते. ती २०१९ च्या फ्रेंच स्पर्धेतील उपविजती आहे. तिने टोकियो ऑलिम्पिकमध्ये रौप्यपदक जिंकले, तरीही क्रीडा रसिकांत फारशी चर्चा नव्हती. प्रतिस्पर्ध्यांचा कस पाहणारी टेनिसपटू अशीच तिची टेनिस जगतात ओळख होती. डावखुरी मार्केता खेळाची चांगली अभ्यासक; तसेच फसव्या रॅली खेळण्याची तिची खासियत. तिला कोणीही विजेतेपदासाठी गृहीत धरत नव्हते. हिरवळीच्या कोर्टवर दहापैकी दोन लढतीच तिने जिंकल्या होत्या. या स्पर्धेतही यापूर्वी एकच विजय मिळविला होता. मनगटाच्या दुखापतीचा तिला फटका बसला होता. पूर्णपणे व्यावसायिक टेनिसपटू असूनही पुरस्कर्ते नव्हते. अगदी पोषाखासाठीही कुणी पुरस्कर्ते नव्हते. या परिस्थितीत ती मानांकन नसतानाही विम्बल्डन जिंकणारी पहिली टेनिसपटू ठरली. या यशाची तिलाही अपेक्षा नसावी. ती या स्पर्धेत चार मानांकितांना हरवून पुढे जात असताना तिचा पती घरी मांजरांचे संगोपन करीत होता. मात्र, अंतिम सामन्यांसाठी तो आला. तिच्या मैत्रिणी, आप्तेष्ट तसेच चाहतेही आले. विजेतेपदासह कोर्टला फेरी मारताना तिच्या चेहऱ्यावरून आनंद निथळत होता. प्रतिकूल परिस्थितीत साथ देणाऱ्यांचे आभार मानण्याची हीच संधी आहे; हीच तिची भावना होती. आता मात्र तिच्या यशाची दखल घेतली जाईल. या स्पर्धेपूर्वी ती जागतिक क्रमवारीत ४२वी होती. एवढेच नव्हे तर चेक प्रजासत्ताकात सातव्या क्रमांकाची खेळाडू होती. आता ती अव्वल दहात आली आहे. मार्केता जिंकत असताना तिच्या लढतीचे प्रक्षेपण हक्क असलेल्या बीबीसीने तिच्यावर केलेल्या अन्यायावर चाहते समाज माध्यमांवर टीका करत आहेत. बीबीसीने केवळ ओन्स जबेरने किती संघर्ष केला, यावरच भर दिला. असो, मार्केता तसेच कार्लोस अल्कराझच्या विजेतेपदामुळे स्पर्धेच्या पहिल्या आठवड्यात रशिया तसेच बेलारुसच्या खेळाडूंच्या सहभागावरून झालेली चर्चा, त्या देशातील खेळाडूंविरुद्ध पराभूत झालेल्यांची हुर्यो.. या गोष्टींचा चाहत्यांना विसर पडला. दोन्ही अनपेक्षित पण गुणी विजेत्यांना याचे श्रेय आहे.

# आता यंत्राद्वारे लावणी : कृषी विभागाचा स्तुत्य उपक्रम

**दै.रायगड नगरी । तळा**

**तळा तालुका हा प्रामुख्याने डोंगरी दुर्गम तालुका असून भात हे प्रमुख पीक आहे. परंतु दिवसेंदिवस भात शेतीचे क्षेत्र कमी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. यासाठी अनेक कारणांबरोबर वेळेवर मजूर न मिळणे व दिवसेंदिवस वाढणारा मजुरीचा दर हे प्रमुख कारण आहे. तसेच पशुधन देखील कमी झाल्यामुळे जमिनीच्या मशागतीसाठी बैलजोडी व नांगरणी देखील वेळेवर करणे शक्य होत नाही. यावर उपाय म्हणून यंत्राद्वारे आधुनिक पद्धतीने भात शेती करणे हे काळाची गरज झाली आहे. यासाठी कृषी विभाग व कृषी विज्ञान केंद्र रोहा यांच्या मार्फत विषेश प्रयत्न करण्यात येत आहे यांचाच एक भाग म्हणून कृषी विभाग व कृषी विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने तळा तालुक्यातील मौजे राणेवाडी येथे यंत्राद्वारे भात लागवड प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले होते.**



या कार्यक्रमासाठी श्री सुधाकर जयवंत पाद्धे विषय विशेषज्ञ कृषि विज्ञान केंद्र रोहा तसेच रोहा येथील प्रगतशील शेतकरी श्री केशव खरीवले, कु. राकेश खरीवले प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले होते. यावेळी तालुका कृषी अधिकारी आनंद कांबळे, मंडळ कृषी अधिकारी सचिन जाधव, कृषी पर्वयेक्षक जितेंद्र गोसावी, बळीराजा जिल्हाउपाध्यक्ष भास्कर गोळे,आत्मा बि टी एम सचिन लोखंडे व कृषी विभागाचे सर्व क्षेत्रीय कर्मचारी व प्रगतशील शेतकरी उपस्थित होते.

पारंपारिक पद्धतीमध्ये एकरी १५ ते १६ किलो बियाणे वापरले जाते. परंतु यंत्राद्वारे लागवड केल्यास फक्त ८ किलो बियाणे पुरेसे होते त्याचबरोबर मजुरीचा देखील खर्च ९०% पर्यंत बचत होऊ शकतो. तसेच रोपांसाठी राब भाजण्याची देखील आवश्यकता नसल्याने तो खर्च देखील वाचतो. अशा पद्धतीने एकरी ३५०० ते ४००० रुपयांमध्ये आपण या पद्धतीने भात शेती करू शकतो असे जयवंत पाद्धे यांनी सांगितले तसेच या पद्धतीने भात शेतीचा खर्च वाचला तर भात शेती परवडू शकते असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यानंतर आनंद कांबळे यांनी मार्गदर्शन करताना चिखलनीसाठी पावर विडर, भात लावण्यासाठी भात लावणी यंत्र व भात कापण्यासाठी भात कापणी यंत्र याद्वारे शेती केल्यास १०० टक्के यांत्रिक पद्धतीने भात शेती केल्यामुळे मजूर टंचाईवर मात करू शकतो असे मत व्यक्त केले. तसेच वरील सर्व यंत्रांसाठी कृषी विभाग मार्फत ५० टक्के अनुदान उपलब्ध असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांनी बाजारात वेगवेगळ्या कंपन्यांच्या अवजारांपैकी शासनमान्य संस्थेचा टेस्ट रिपोर्ट असणाऱ्या अवजारासाठी महाडीबीटी अर्ज करावा असे आवाहन केले राणेवाडी येथील प्रगतशील शेतकरी भास्कर गोळे यांचे शेतावर प्रत्यक्ष भात लावणी प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले होते यंत्र हाताळणी कशी करवी यासाठी रोहा येथील प्रगतशील शेतकरी श्री केशव खरीवले व कु. राकेश खरीवले यांनी विनामोबदला मार्गदर्शन केले तसेच श्री हेमेंतशेठ ठाकूर, भैरवनाथ शेतकरी उत्पादक गट यशवंतखार रोहा यांनी मॅट नर्सरी करणेसाठी २१० ट्रे विनामोबदला पुरवले यावेळी उपस्थित सर्व शेतकऱ्यांचे यंत्राविषयी असणाऱ्या सर्व शंकांचे समाधान करण्यात आले. बऱ्याच शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष भात लागवड करण्याचा देखील अनुभव घेतला व ही भात लावणीची सोपी पद्धत असल्याचे मनोगत व्यक्त केले. सचिन जाधव मंडळ कृषी अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# रोटरी स्कुल येथे वृक्षारोपण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊन, दाऊदी बोहरा जमात पनवेल, इनरव्हील क्लब आणि रोटरॅक्ट क्लबतर्फे नवीन पनवेल येथील रोटरी स्कूल येथे वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी चंपा, बुगनविलिया आणि कडुनिंबाची ६० झाडे लावण्यात आली. वृक्ष हे पर्यावरणातील खूप महत्वाचा भाग आहेत. भरपूर प्रमाणात वृक्षतोड झाल्यामुळे वनक्षेत्र कमी होत आहे. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण करणे गरजेचे आहे. या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउन, दाऊद बोहरा जमात पनवेल, इनरव्हील क्लब आणि रोटरॅक्ट क्लबतर्फे नवीन पनवेल येथील रोटरी स्कूल येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी चंपा, बुगनविलिया आणि कडुनिंब या प्रजातींची ६० झाडे परिसरात लावण्यात आली. या कार्यक्रमाप्रसंगी रोटरी ट्रस्ट चेअरमन अरविंद सावळेकर, संजय जैन मित्र मंडळाचे अध्यक्ष संजय जैन, अलियासगर वोहरा, सैफुद्दीन पनवेलवाला, अलीभाई गोलवाला आणि इतर सदस्य उपस्थित होते.

# माणगाव येथे दोन दिवसीय निवासी अभ्यास शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

दिनांक १५ व १६ जुलै रोजी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद दक्षिण रायगड जिल्ह्याचे दोन दिवसीय निवासी अभ्यास वर्ग माणगाव येथील वनवासी कल्याण आश्रम शाळेत पार पडले. या अभ्यास वर्गासाठी मुख्य उद्घाटक अभाविप पूर्व कार्यकर्ते व आश्रम शाळा माणगाव शाळेचे मुख्याध्यापक उत्तम पाटील, वनवासी कल्याण आश्रम शाळेचे अधीक्षक विलास देगावकर, अधिक्षिका मीनाक्षी कांबळे, दक्षिण रायगड जिल्हा संयोजक कुणाल आंबले, अभ्यास वर्ग प्रमुख राहुल डाके, अभ्यासवर्ग सह प्रमुख स्नेहा चौकर, व्यवस्था प्रमुख मयूर ढेपे यांनी कार्यक्रमाचे उत्तम प्रकारे नियोजन केले. यावेळी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने केलेल्या कामांची चित्रफीत उपस्थित विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली.

या अभ्यास वर्गात अभाविप परिचय पुर्व कार्यकर्ते उत्तम पाटील यांनी मांडणी केली. अभाविप कार्यपद्धती, ओजस जयवंत(कोंकण प्रदेश कार्यालय मंत्री),महाविद्यालयीन कार्य, तन्मय पाटील, रायगड विभाग संयोजक यांनी माहिती दिली. कार्यकर्ता विकास व विद्यार्थीनी वाढ ज्योती पाटील, विद्यापीठ कायदा, रितेश चौधरी यांनी मार्गदर्शन केले.

या अभ्यास वर्गासाठी दक्षिण रायगड जिल्ह्यातून १७ विद्यार्थी व ३२ विद्यार्थिनी उपस्थित होत्या.सर्वाधिक उपस्थिती श्रीवर्धन तालुक्यातील विद्यार्थ्यांची होती. या अभ्यास वर्गात महाड, रोहा, माणगाव, पाली या तालुक्यातील पूर्व कार्यकर्त्यांनी व हितचिंतकांनी अभ्यास वर्गाला भेट दिली. यावेळी दक्षिण रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यातील कार्यकारणी जाहीर करण्यात आल्या. दक्षिण रायगड जिल्हा समितीमध्ये जिल्हा संयोजक म्हणून कुणाल आंबले, जिल्हा सहसंयोजक म्हणून स्नेहा चौकर, जिल्हा सोशल मीडिया प्रमुख हर्षल ठाकूर, जिल्हा व्यवस्था प्रमुख मयूर ढेपे, जिल्हा समिती सदस्य स्मिता देगावकर यांची नियुक्ती करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रवास व संपर्कप्रमुख नीरज खुरकुटे, (प्रदेश सहमंत्री) यांनी विशेष मेहनत घेतली.

# दोन मोटार सायकल समारोसमोर धडक; एक जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दोन मोटारसायकलस्वरांच्या समोरासमोर धडकेत एक जण जखमी झाल्याची घटना कामोठे वसाहतीत घडली आहे.

वैभव धनुरे हा त्याच्या मालकीच्या मोटारसायकल (एमएच ०४ जेजे ९७०३) वरून मित्राच्या घरी कार्यक्रमासाठी जात असताना समोरून येणाऱ्या संदेश थोरात याने त्याची मोटारसायकल हयगयीने निष्काळजीपणाने व बेदरकारपणे चालवून वैभव धनुरे याच्या मोटारसायकलीला धडक दिली.

या धडकेत वैभव धनुरे हा गंभीर जखमी झाला असून त्याचा उजवा पाय व हाताचे बोट फ्रक्चर झाले आहे. या घटनेची नोंद कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.शांताराम मुरलीधर खोंडे, रा.एल.आय.जी., सेक्टर ३, कळंबोली, व्यवसाय : न्हावी करीत आहे. आमचे अशिल यांची आई श्रीमती.सिंधुबाई मुरलीधर खोंडे यांच्यापासून आमचे अशिल सन २०१३ पासून विभक्त राहत आहे. आज रोजी आमचे अशिल यांची आई कुठे राहते आहे, काय करीत आहेत याबाबत काहीही माहित नाही.

या नोटीसद्वारे मी जाहीर करीत आहे की, माझ्या आईने कोणाकडून उसने पैसे घेतले असतील किंवा कुणासोबत आर्थिक व्यवहार केले असतील त्यासाठी माझा काडीममात्र संबंध नाही व माझ्या आईने केलेल्या पैशाच्या व्यवहारा / अपहाराबद्दल कुणीही मला जबाबदार ठरवू शकत नाही. कुणीही व्यक्ती माझ्या आईसोबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार करीत असतील तर ती त्याची स्वतःची जबाबदारी असेल याची नोंद घ्यावी.

दि.१८/०७/२०२३

सही/-

**ॲड.धर्मनाथ नामा गोंधळी**

**निलकंठ हाईटस्, प्लॉट नं.४३ ए व ४४ ए, रुम नं.ए-७०२, सेक्टर-१६, कळंबोली, नवी मुंबई-४१०२१८**

**मो.नं.९३२३४४१०८५**



कोर्ट मा.एम.डी.सैदाणे

अर्जदारतर्फे वकील : श्री.जगदीश ठाकूर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी साहेब प्रथम वर्ग यांचे कोर्टात

क्रिमिनल चौकशी अर्ज नं.७६०/२०२२

श्रीमती.नर्मदा शाम घरत
वय : ६५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.१२३, सेक्टर-२३,
उलवे नोड, वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामसेवक, ग्रामपंचायत उलवे
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार ही राहणारी उलवे नोड, वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथील कायमस्वरुपी रहिवाशी आहे. अर्जदार यांचे वडील कै.बाबुराव रामचंद्र पाटील यांचा मृत्यू तारीख १७/०८/१९६८ रोजी मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव अनवधानाने सदर मृत्यूची नोंद संबंधित कार्यालयामध्ये करण्याचे राहून गेले आहे. अर्जदार यांचे वडील कै.बाबुराव रामचंद्र पाटील यांच्या मृत्यूची नोंद कुठेच नाही. तसा दाखला ग्रामपंचायत उलवे, ता.पनवेल, जि.रायगड यांनी दिलेला आहे. याबाबतचा दाखला अर्जदार या मे.कोर्टात दाखल करीत आहेत. अर्जदार यांचे वडील कै.बाबुराव रामचंद्र पाटील यांच्या मृत्यूचा दाखला हा अर्जदार यांचे वडील कै.बाबुराव रामचंद्र पाटील यांचा वारस दाखला मिळणेसाठी आवश्यक आहे. म्हणून अर्जदार यांनी जन्म-मृत्यू नोंद कायदा १९६९ कलम १३ (३) प्रमाणे मृत्यूची उशिरा नोंद करून मिळण्याबाबत संबंधित ग्रामपंचायत अधिकारी, उलवे, ता.पनवेल, जि.रायगड यांना योग्य ते आदेश देण्यात यावेत याकरिता अर्जदार सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल करीत आहेत.

वरील अर्जदार हिचे वडील कै.बाबुराव रामचंद्र पाटील यांचा मृत्यूचा दाखला देण्याबाबत कुणाचीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. सदरच्या नोटीसीस मुदतीत हरकत न आल्यास मृत्यूचा दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.१५/०७/२०२३ रोजी कोर्टाच्या सही-शिक्क्याने दिले.

**सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल**



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : धोधाणी, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली शेतजमीन आहे. सदरची शेतजमीन ही आमचे अशिल यांनी सदर नोटीसमध्ये नमूद केलेले जमीन क्षेत्र विकत घेण्याचे ठरविलेले असून त्या शेत मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : धोधाणी, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | भोगवटादार नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ५६ | ६/अ/२/अ | ५-८४-३५<br>पो.ख. ०-६०-०००<br>एकूण क्षेत्र ६-४४-३५ पैकी खरेदी क्षेत्र ०-१८-०० (हे.आर.पॉ.) | ११.४७ |

वरील शेत जमिनीचे सातबारा सदरी १) श्री.दत्तात्रेय बाळाराम कुरंगळे, रा.रुम नं.३०१, गुरुप्रसाद अपार्टमेंट, पनवेल पोलीस स्टेशन जवळ, ता.पनवेल, जि.रायगड २) श्री.किरण माधव नांगरे, रुम नं.ए/६, श्रीजी को.ऑप.हौ.सो. प्लॉट नं.२७, सेक्टर ३, पनवेल, जि.रायगड यांचे नावाची नोंद आहे. तरी सदरहू शेतजमीन / मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, ददान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री, पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर जमीन मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर शेत मिळकतीचा साठेकरार / विक्रीचे करार व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल

दि.१८/०७/२०२३

सही/-

**ॲड.श्री.विजय गणेश गडगे**

**अे १०१, अंबिका पार्क को.ऑप.हौ.सो. लि., प्लॉट नं.१, सेक्टर-६, श्री कृपा हॉल समोर, खांदा कॉलनी, पनवेल-४१०२०६**

**मो.नं.७०४५८७३१६१**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# मुंबई गोवा हायवे वरील आंबेवाडी नाक्यावरील रस्त्याला तलावाचे स्वरूप

## मार्ग काढतांना होते वाहन चालकांची तारांबळ

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

**मुबंई गोवा महामार्गावरील आंबेवाडी कोलाड-रोहा मार्गावरील आंबेवाडी नाक्यावरील रस्त्याला प्रचंड पडत असलेल्या पावसामुळे तलावाचे स्वरूप निर्माण झाले असुन या रस्त्यावरून मार्ग काढतांना वाहचालकांनी तारांबल उडत असुन या बाजारपेठेतील गटाराचे काम निस्कृष्ठ दर्जाचे व अर्धवट केल्यामुळे कोणाचा तरी जिव गेल्यानंतर गटाराचे काम पूर्ण केले जाईल काय? अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवाशी वर्गातून केली जात आहे.**



मुंबई गोवा हायवे वरील आंबेवाडी नाका हे बाजारपेठेचे मुख्य ठिकाण असुन काल मोठया प्रमाणात पडलेल्या पावसामुळे या बाजारपेठेच्या ठिकाणी तल-ावाचे स्वरूप निर्माण झाले असुन या प्रचंड साचलेल्या पावसाच्या पाण्यामुळे या रस्त्यावरून प्रवास करणे धोक्याचे झाले आहे.

तीच याला कारण ही या रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या गटारा काम निस्कृष्ठ दर्जाचे दोन्ही साईडचे गटार उंच आऱ्याला व रस्ता जणू गटाराच्या पायथ्याशी आहे. यामुळे पडलेले पावसाचे पाणी जाण्यासाठी जागा न ठेवल्यामुळे पडलेले पाणी पुर्ण बाजापेठेत घुसत आहे.

मुंबई-गोवा हायवे वरील कामाला तब्बल १३ वर्ष पूर्ण झाली तरी देखील काही केल्या प्रवासी नागरिकांच्या समस्या सुटता सुटत नाही या ठिकाणी संबंधित खाते अथवा ठेकेदार जाणून बुजून बे जबाबदारपणा करत डोळेझाक करत असल्याचे समोर येत आहे. तब्बल आठ कोटींहून अधिक रक्कम खड्डे दुरुस्तीसाठी खर्च केल्याचे बोलले जात आहे मात्र कोटीच्या कोटी रुपये खर्च करून देखील या मार्गाची अवस्था पावसाळ्या नंतर अधिक गंभीरपणे होत चालली असल्याचे दिसून येते तर खड्ड्यात जड अवजड वाहने ही आदळून त्यांची तुटातुट होत आहेत.अमरावती ते अकोला येथील ७५ किलोमीटरचा चौपदरीकरणाचा रस्ता फक्त ५ दिवसात केला जात असुन त्याची नोंद ग्रीनीज बुकात केली जाते परंतु आपल्या मुंबई-गोवा रस्त्याला लोकनेत्यांकडून फक्त तारीख पे तारीख दिली जात आहे.

■ मुंबई गोवा महामार्गावरील पळस्पे ते इंदापूर दरम्यान चौपदरी कारणासाठी कोणतेही सबब न ऐकता असंख्य व्यवसायिकांची दुकाने उध्वस्त केली. त्या बदल्यात नवीन जागा दिली जाईल असे शासनाकडून सांगण्यात आले होते परंतु ते राहिले दुरच परंतु संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला ही पुरेसा मिळाला नाही व ज्यांना मिळाला तो ही कमी किंमतीच्या भावात यांच्यामुळे त्यांच्या वर गेली तेरा वर्षांपासून उपासमारीची वेळ आणली परंतु चौपदरी करणाचे काम पूर्ण होऊ शकले नाही. काही याउलट दिवसेंदिवस या महामार्गाची परिस्थिती अतिशय बिकट बनत चालली असुन या मार्गानी प्रवास करणारा प्रवाशी घरी परत सुखरूप पोहचेल याची खात्री देता येत नाही.

■ लोकप्रतिनिधी मात्र महामार्गाची पाहणी करुन या महामार्गाचे काम एका वर्षात पुर्ण होईल असे २०१८ पासून बोलत आहेत परंतु महामार्गाचे काम काय पुर्ण होईना? याशिवाय या महामार्गावर दररोज असंख्य अपघात होऊन अनेकांना आपला जिव गमवावा लागत आहे व त्याचे कुटूंब पूर्णपणे उध्वस्त होते. याला जबाबदार कोण? असे प्रवाशी वर्गातून बोलले जात आहे.

# नागोठणे रेल्वे स्थानकासमोरील हायवेलगतचे एसबीआय एटीएम संध्याकाळी होतेय बंद

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

आर्थिक व्यवहाराच्या व उलाढालीच्या बाबतीत नागोठण्यातील सर्वात मोठी बँक समजली जाणाऱ्या स्टेट बँक बँक ऑफ इंडियाच्या नागोठणे शाखेचे शाळेबाहेरच व नागोठणे रेल्वे स्थानकोसमोर आणि महामार्गालगत असलेले एटीएम गेल्या काही महिन्यांपासून संध्याकाळी बंद करण्यात येत आहे. त्यामुळे येथे पैसे काढण्यासाठी येणाऱ्या ग्राहकांची गैरसोय होत असून हे एटीएम २४ तास ग्राहकांच्या सेवेत सुरु ठेवावे अशी मागणी एसबीआयसह इतर बँक ग्राहक व नागरिकांतून होत आहे.

नागोठणे परिसरात असलेल्या रिलायन्स इंडस्ट्रीज लि., सुप्रीम पेट्रोलियम, सुकेळी येथील जिंदाल समुहाच्या अनेक कंपन्यांतील कामगार व अधिकारी वर्गाची पगार खाती, तसेच नागोठणे व परिसरातील विविध व्यावसायिक व मोठ-मोठे व्यापारी यांची मोठ-मोठी खाती या बॅंकेत आहेत. तसेच या बँकेत ग्राहकांसाठी विविध प्रकारच्या सेवा असल्याने या बँकेचा ग्राहक वर्ग खुप मोठा आहे. तसेच नागोठणे रेल्वे स्थानकाजवळच हा एटीएम असल्याने रेल्वे प्रवाशांना पैशांची तातडीने गरज लागल्यास त्यांच्यासाठीही हा एटीएम खुप सोयीचा आहे. असे असतांनाही एसबीआयच्या या नागोठणे शाखेचा व शाखे बाहेरच असलेला एटीएमचा शटर रोज संध्याकाळी ७ वाजता बंद करण्यात येत आहे. नंतर सकाळी ६ वाजता सुरु करण्यात येत आहे. संध्याकाळ पासून रात्रभर हा एटीएम बंद असल्याने ग्राहकांतून नाराजीचा सूर उमटत आहे. तसेच हे महामार्गालगतचे सर्वांच्या



सोयीचे एटीएम तातडीने व पूर्ववत २४ तास सुरु करण्याची मागणी बँक ग्राहक तसेच इतर नागरिकांतून होत आहे.

### सुरक्षेच्या कारणास्तव हे एटीएम रात्री बंद

एसबीआय च्या नागोठणे शाखेचे शाखा व्यवस्थापक प्रसाद डांगळे यांच्याशी यासंदर्भात संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, मी नुकताच जुन महिन्यात एसबीआयच्या नागोठणे शाखेत शाखा व्यवस्थापक म्हणून रूजू झालो आहे. तेव्हा मला समजले की, हे एटीएम यापूर्वी २ ते ३ वेळा चोरट्यांनी फोडले असल्याने वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार व पोलिसांच्या सूचनेनुसारच हे एटीएम रात्रीच्या वेळेस बंद ठेवण्यात येत आहे. असे असले तरी आमचे विशाल मेडिकल येथील एटीएम २४ तास सुरु असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# केजीपी शिक्षण संस्था तळोजा येथे वृक्षारोपण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा येथील डी अँड जी २२१ व्हीआयपी सेक्युरिटी बटालियन तळोजा आणि केजीपी शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि इलाईट पब्लिक स्कूलच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले.

तळोजा येथील कमलगौरी हिरु पाटील शिक्षण संस्थेच्या तळोजा पाचनंद, सेक्टर ११ येथील दि इलाईट पब्लिक स्कूलमध्ये संस्थेचे चेअरमन व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे रायगड जिल्हा संपर्कप्रमुख बबन दादा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत डी अँड जी २२१ व्हीआयपी सेक्युरिटी बटालियन, तळोजा आणि केजीपी शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी कमांडर संदीप सिंग संस्थेचे चेअरमन प्राचार्य इलामती, डॉ. कांबळे सर, शिक्षक, विद्यार्थी व इतर बटालियन आदींचा सहभाग होता. यावेळी संस्थेचे चेअरमन व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे रायगड जिल्हा संपर्कप्रमुख बबन दादा पाटील यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणाच्या रक्षणाचे महत्व समजावून सांगत सामाजिक बांधिलकी जपत वृक्षारोपण यासारखे उपयोगी उपक्रम राबविल्याबद्दल शाळेचे व डी अँड जी २२१ व्हीआयपी सेक्युरिटी बटालियनचे आभार मानले.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मौजे : पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील पनवेल महानगरपालिका हद्दीतील सिटी सर्व्हे प्रॉपर्टी क्रमांक ११७४, क्षेत्र ३२६.९ चौरस मीटर ही मिळकत मे.परशुराम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता : प्लॉट नंबर ११७४, बागवान मोहल्ला, मिरची गल्ली, पनवेल यांचे नावे मालकी हक्काने आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील पनवेल महानगरपालिका यांचे हद्दीतील मिळकत सिटी सर्व्हे प्रॉपर्टी क्रमांक ११७४, क्षेत्र ३२६.९ चौरस मीटर**

वरील प्रमाणे नमूद पनवेल महानगरपालिका यांचे हद्दीतील मिळकत सिटी सर्व्हे प्रॉपर्टी क्रमांक ११७४, क्षेत्र ३२६.९ चौरस मीटर ही मिळकत मालमत्तापत्रक भोगवटादार सदरी मे.परशुराम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांचे नावे आहे. त्यांनी सदरची वरील नमूद मिळकत आमचे अशिल श्री.सिद्धीविनायक रिअल्टी बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, पनवेल यांचेकडे पुर्नविकास / पुर्नबांधणी / रिडेव्हलोपमेंट करिता देण्याचे ठरलेले आहे. या संदर्भात आमचे अशिलांसोबत दिनांक १२ मे, २०२३ रोजी नोटराईज एमओयू समझोत करार करण्यात आलेला आहे.

सदरहू वरील नमूद मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद भोगवटादार मे.परशुराम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांचे बरोबर ठरविलेला पुर्नविकास / पुर्नबांधणी / रिडेव्हलोपमेंट संदर्भातील व्यवहार पूर्ण कररतील व यावरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.१८/०७/२०२३

**सही/-**
**मयुरेश प्र. हनुमंते**
**ॲडव्होकेट-हायकोर्ट**
**शॉप नं.बी/१०१, योगेश्वर कृपा बिल्डींग, ठाणा नाका रोड, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८२८६१२१३३३**

# श्रीवर्धन तालुक्यात गतआहारी अमावस्या व दीप अमावस्या उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

दरवर्षी आषाढ महिन्यात येणारी अमावस्या ही गतआहारी अमावस्या किंवा दीप अमावस्या म्हणून साजरी करण्यात येते. यावेळी आषाढ अमावस्येला सोमवार आल्याने या अमावस्येला सोमवती अमावस्या असे देखील संबोधले जाते. यावर्षी मराठी पंचांगाप्रमाणे श्रावण महिना अधिक असला तरीही ही अमावस्या नेहमीप्रमाणेच साजरी करण्यात आली. आषाढ ते कार्तिक या महिन्यादरम्यान चातुर्मास असल्याने हिंदू धर्मातील विविध सण या काळात होत असतात. आपल्या घरामध्ये अनेक प्रकारचे दिवे समई, लामण दिवा, निरंजन, तुपाचे निरंजन, असे विविध प्रकारचे दिवे असतात. परंतु हे दिवे नेहमी वापरत नसल्यामुळे कुठेतरी अडगळीत पडलेले असतात. या अमावस्येच्या निमित्ताने सदरचे दिवे घासून पुसून स्वच्छ करून त्यांची पूजा करून ते प्रज्वलित केले जातात.

तसेच अमावस्येला हिंदू धर्मशास्त्रानुसार गतआहारी अमावस्या असे म्हटले जाते. गत आहार म्हणजे आपण यापूर्वी घेतलेला आहार किंवा मागील काळापर्यंत घेतलेला आहार. या अमावस्ये नंतर श्रावण महिना सुरू होणार असल्याने अनेक जण मास मच्छी किंवा कांदा, लसूण देखील आपल्या आहारामध्ये वर्ज्य करत असतात. त्यासाठी या अमावस्येला गतआहारी अमावस्या असे शास्त्रानुसार म्हटले आहे. परंतु ज्यांना मद्य प्राशन करून खरोखर गटारात लोळायचे आहे. अशा लोकांनी या गत अहारी शब्दाचा अपभ्रंश करून गटारी अमावस्या असे नाव देऊन टाकले आहे. वास्तविक पाहता गटार हा शब्द इंग्रजी आहे. मराठी मध्ये सांडपाणी वाहून नेणारा नाला असे गटाराला म्हटले जाते. त्यामुळे आपल्या धर्मशास्त्रात गटारी हा शब्द कुठेही प्रचलित नाही. परंतु नवीन पिढीने गटारी याचा अर्थ त्या दिवशी भरपूर दारू पिऊन मास, मच्छी खाऊन गटारात लोळणे या अर्थानेच काढलेला आहे. याबाबत हिंदू धर्मामध्ये जनजागृती करण्याची आवश्यकता आहे. यावेळी अमावस्या सोमवारी आल्याने अनेक नागरिकांनी रविवारीच गतआहारी अमावस्या साजरी केली. चिकन, मटणाच्या दुकानांमध्ये रांगाच पाहायला मिळत होत्या. तसेच मद्य विक्री देखील जोरात सुरू होती. तर व्रत वैकल्य पाळणाऱ्या नागरिकांनी व महिलांनी आपल्या घरातील दिव्यांची विधिवत पूजा करून दीप अमावस्या उत्साहात साजरी केली.



मा.सोनावणे सो

ॲड.विजयेंद्र नारायण मुंढे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ सतर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१७९६/२०२२
नि.नं.१६
ने.ता.०५/०८/२०२३

१) सौ.दर्शना जनार्दन हुद्दार
लग्नापूर्वीचे कु.दर्शना अशोक तारेकर
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.नांदगांव, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे वडील कै.अशोक श्रावण तारेकर हे दि.२३/०२/१९९४ रोजी मौजे : मु.पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. तसेच त्यांची आई कै.सखुबाई श्रावण तारेकर ह्या दि.२२/०९/२००३ रोजी मौजे : मु.पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड तसेच त्यांची पत्नी सरिता अशोक तारेकर ह्या दि.०७/०९/१९८३ रोजी मु.पोदी नं.१, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. कोर्टास सदरहू मयत कै.अशोक श्रावण तारेकर यांची मौजे : पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड येथील त्यांचे खुद्द मालकीची नावे असलेली तसेच प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पारगांव, डुंगी, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १५ | ६ | ४ ब | ०-२१-९० |
| २९ | ६ | १० | ०-४४-५० |
| | ३६ | ९ | ०-१०-२० |

वरील संपादीत मिळकतीच्या मोबदल्यात खालील भूखंड इरादीत करण्यात आलेला आहे.

**नोड : पुष्पकनोड, ता.पनवेल, जि.रायगड**

| सेक्टर | भूखंड क्र. | क्षेत्र |
|---|---|---|
| २ | १ | १२०० चौ.मी. पैकी २०० चौ.मी. क्षेत्र |

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील कै.अशोक श्रावण तारेकर यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.१८/०७/२०२३ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मे.वडणे सो.यांचे कोर्ट

ॲड.प्रविण प्र. पिसाळ
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.६५/२०२३
नि.नं.७/ड
ने.ता.२५/०८/२०२३

१) श्रीमती.तमनप्रीत वेंकटेश
वय : ६४ वर्षे, धंदा : निवृत्त
२) कुमारी.श्रीया वेंकटेश
वय : ३७ वर्षे, धंदा : नोकरी
वरील १ व २ सदनिका क्र.५०१, पाचवा मजला, टॉवर क्र.५, ई-विंग, द स्प्रिंग, भूखंड क्र.०४, सेक्टर २०, रोडपाली, तळोजा रोड ककळंबोली, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की, कुमारी.श्रीया वेंकटेश रा.सदनिका क्र.५०१, पाचवा मजला, टॉवर क्र.५, ई-विंग, द स्प्रिंग, भूखंड क्र.०४, सेक्टर २०, रोडपाली, तळोजा रोड कळंबोली, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ येथे राहत असून ती अज्ञान आहे. कुमारी.श्रीया वेंकटेश हिचे वडील कै. क्रिश्नन वेंकटेश यांचे निधन दि.०९/०४/२०२१ रोजी दोहा कॉटर येथे झाले असून वरील अर्जदार श्रीमती.तमनप्रीत वेंकटेश यांना खाली नमूद मिळकतीबाबत कुमारी.श्रीया वेंकटेश यांचे पालनकर्ती म्हणून नेमणूक करून मिळावी. तसेच अज्ञानांचा पालनकर्ती म्हणून श्रीमती.तमनप्रीत वेंकटेश यांना अज्ञानांची स्थावर मिळकत विक्री करण्याबाबत परवानगी मिळण्याककरिता अर्ज केला आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**सदनिका क्र.५०१, पाचवा मजला, टॉवर क्र.५, ई-विंग, द स्प्रिंग, भूखंड क्र.०४, सेक्टर २०, रोडपाली, तळोजा रोड कळंबोली, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड**
**क्षेत्रफळ १३६२ चौ.फुट कारपेट + ३२१ चौ.फुट टेरेस व एफबी**

सदरहू अर्जदार या कुमारी.श्रीया वेंकटेश यांची अज्ञान पालनकर्ती आई नाही असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीस प्रसिद्धीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट श्रीमती.तमनप्रीत वेंकटेश ह्यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि त्यांना कुमारी.श्रीया वेंकटेश यांचे हिश्श्यास येणाऱ्या मिळकतीचे नैसर्गिक पालनकर्ता म्हणून घोषित करण्यात येईल व त्याची अज्ञान पालनकर्ता म्हणून नेमणूक करून त्याच्या हिश्श्याची मिळकत विक्री करता येईल तसेच त्यानंतर आलेल्या हरककतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१८/०७/२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **अति.जिल्हा न्याया.पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **अति.जिल्हा न्याया.पनवेल**

# लोकशाहीर अणणाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त महेश साळुंखे यांनी केले अभिवादन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

थोर समाजसुधारक, लेखक, लोकशाहीरअण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी अभिवादन करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. महेश साळुंखे दरवर्षी आपला वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करतात. त्यांच्या वाढदिवशी वृक्षारोपण, मोफत वह्या वाटप, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, गणवेश वाटप, रुग्णालयात फळे वाटप, अशा विविध कार्यक्रमांची रेलचेल असते. याअंतर्गत महेश साळुंखे यांच्या ऑगस्ट महिन्यात येणाऱ्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याकरिता पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक २३ जुलै रोजी आयोजित करण्यात आली असल्याची माहिती महेश साळूंखे यांनी दिली.

मा.पवार मॅडम कोर्ट

अर्जदारातर्फे वकील : ॲड.आशिष पनवेलकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.९००/२०२३
नि.नं.७/ड
ने.ता.१२/०९/२०२३

कै.सत्याप्रसाद मोहनलाल ध्यानी (मयत)
यांचे कायदेशीर वारस
१) श्रीमती.सुमित्रा सत्याप्रसाद ध्यानी
वय : ६६, व्यवसाय : गृहिणी
रा.फ्लॅट नं.२०४, बिल्डींग-एम,
रेल विहार को.ऑप.हौसिंग सोसायटी,
सेक्टर ४, प्लॉट नं.४, खारघर, तालुका : पनवेल,
जिल्हा : रायगड, राज्य-महाराष्ट्र ४१०२१०
२) सौ.रेनु ललित शर्मा पुर्वाश्रमीचे नाव
सौ.रेनु सत्याप्रसाद ध्यानी
वय : ४७, व्यवसाय : गृहिणी
रा.डी-४ ३ ब्लॉक जयंती गार्डन अपार्टमेंट,
शकराबाद नगर जे पी नगर फेज १, इंदिरा गार्डन सर्कल,
जे पी नगर, बॅंगलोर कर्नाटक ५६००७८
३) श्री.सुनील सत्याप्रसाद ध्यानी
वय : ४५, व्यवसाय : नोकरी
रा.फ्लॅट नं.२०४, बिल्डींग-एम,
रेल विहार को.ऑप.हौसिंग सोसायटी,
सेक्टर ४, प्लॉट नं.४, खारघर, तालुका : पनवेल,
जिल्हा : रायगड, राज्य-महाराष्ट्र ४१०२१०
४) श्री.सुशील सत्याप्रसाद ध्यानी
वय : ४१, व्यवसाय : नोकरी
रा.फ्लॅट नं.२०४, बिल्डींग-एम,
रेल विहार को.ऑप.हौसिंग सोसायटी,
सेक्टर ४, प्लॉट नं.४, खारघर, तालुका : पनवेल,
जिल्हा : रायगड, राज्य-महाराष्ट्र ४१०२१० — अर्जदार क्र.१ ते ४

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीशीने सर्व जनतेस कळविण्यात येते की, कै. सत्याप्रसाद मोहनलाल ध्यानी (मयत) यांचे वारस अर्जदार क्र.१ पत्नी असून व २ ही मुलगी अर्जदार क्र.३ व ४ हे मुले आहेत. यांच्याशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. कै.सत्याप्रसाद मोहनलाल ध्यानी यांचा दि.२८/०१/२०१७ रोजी INHS ASVINI HOSPITAL नेव्ही नगर, कुलाबा मुंबई ४००००५ येथे निधन झाले होते.

**कै.सत्याप्रसाद मोहनलाल ध्यानी यांच्या मिळकतीचे वर्णन**

**फ्लॅट नं.२०४ बिल्डींग-एम रेल विहार को.ऑप.हौसिंग सोसायटी सेक्टर-४ प्लॉट नं.४, खारघर, तालुका : पनवेल, जि.रायगड राज्य-महाराष्ट्र पिन कोड ४१०२१०**

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदारांशिवाय कोणीही या मिळकतीला वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१७ माहे ०७ सन २०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**

# मोरबे धरणावर पर्यटकांची गर्दी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**धो धो पाऊस बरसात असल्याने रविवारी पनवेल तालुक्यातील मोरबे धरणावर पर्यटकांनी धमाल उडवली होती. मोरबे धरणाच्या भिंतीवरून धबधब्यासारखे फेसाळणारे पाण्याचा शेकडो पर्यटकानी मनसोक्त आनंद लुटला.**



पावसाळा सुरु झालेला असल्याने पर्यटकांच्या आनंदाला पारावर राहिलेला नाही. तालुक्यातील गाढेश्वर व मोरबे धरण देखील पर्यटकांना खुणावू लागला आहे, निसर्गरम्य ठिकाण, हिरवीगार वनराई आणि भिरभिरणारा वारा या थंड वातावरणात धबधब्याखाली चिंब भिजण्याची मजा काही औरच म्हणावी लागेल. पनवेलपासून २० कि.मी.अंतरावर असलेल्या मोरबे धरणाकडे पर्यटकांची गर्दी वाढू लागलेली आहे. निसर्गाचे सानिध्य,हिरवाई,चारही बाजूने डोंगराच्या रांगा यामुळे पर्यटक धरणाकडे अधिक आकर्षक होतात. मनसोक्त डुंबण्यासाठी इच्छुक असणारे पर्यटक या ठिकाणी आवर्जून येतात. शनिवार आणि रविवार सुट्टीचा वार म्हटला की हजारोंच्या संख्येने पर्यटक या मोरबे धरणांत मौजमजा करण्यासाठी येतात. धो धो पाऊस बरसात असल्याने रविवारी पनवेल तालुक्यातील मोरबे धरणावर पर्यटकांनी धमाल उडवली होती. मोरबे धरणाच्या भिंतीवरून धबधब्यासारखे फेसाळणारे पाण्याचा शेकडो पर्यटकानी मनसोक्त आनंद लुटला.

मोरबे येथील ५० एकर जमिनीवर धरण वसलेला आहे. पर्यटक धरणात मौजमजा करण्यासाठी उतरत असल्यामुळे या ठिकाणी पोलीस तैनात करण्यात आले आहेत. धरणातील पाण्यात उतरून कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांकडून आवाहन करण्यात येत आहे. पोलिसांच्या बंदीमुळे पर्यटकांचा हिरमोड होत आहे. मात्र तरी देखील काही पर्यटक येथे मौजमजा करण्यासाठी येतात.

शनिवार रविवारी मोठ्या प्रमाणात पर्यटक या ठिकाणी पाण्यात मौज मजा करण्यासाठी येतात. रविवारी १६ जुलै रोजी अनेक पर्यटकांनी धरणाच्या पाण्यात मौजमजा केली. धरणावर बांधलेल्या बंधारयावरून आदिवासी बांधव ये जा करत असतात मात्र त्या बंधाऱ्यावर चालत जाण्याचा प्रयत्न पर्यटक करत असल्यामुळे या ठिकाणी जीवितहानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सध्या मुसळधार पाऊस पडत असल्याने धरणातील पाण्याचा विसर्ग सुरू आहे तसेच धरणातील पाणी देखील वाढले आहे मौजमजा करण्यासाठी आलेले तरुण या ठिकाणी खाली उतरतात पावसाळ्यात येथील रस्ते निसरडे होतात त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे.

# उरण तालुक्याला मुसळधार पावसाने झोडपले

**दै.रायगड नगरी । उरण**

गेले चार दिवस संततधार पडणाऱ्या मुसळ-धार पावसाने उरण तालुक्याला झोडपून काढले आहे. सर्वत्र पूरस्थिती निर्माण झाली आहे अनेक ठिकाणी सकल भागात पावसाचे पाणी साचले असून जनजीवन विस्कळित झाले आहे. त्यात म्हातवली ग्रामपंचायत हद्दीत पुर परिस्थिती निर्माण झाली असून नाल्यात वाहने पडल्याची घटना घडली आहे.



विश्रांती घेतलेल्या पावसाने जुलै महिना पासून उरण तालुक्यात दमदार सुरुवात केल्याने शेतकरी सुखावला नांगरणी, भात लावणीच्या कामांत गर्क झाला आहे. मात्र गेल्या चार दिवसांपासून मूसधार पावसाळा सुरवात झाल्याने सर्वत्र पाणीच पाणी होऊन पूरस्थिती निर्माण झाली आहे काही भागातील भात शेती पाण्याखाली गेली आहे. तसेच सखळ भागात, रस्त्यावर पावसाचे पाणी साचल्याने वाहनांना रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांचा सामना करावा लागत आहे.

शाळा, कॉलेजात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना रस्ता काढणे मुस्किल झाले आहे. तसेच कामावर जाणाऱ्या चाकरमान्यांचे, नोकरदार वर्गाचे हाल होत आहेत. म्हातवली ग्रामपंचायत हद्दीत पुर परिस्थिती निर्माण झाली असून नाल्यावर रस्त्यावर पावसाचे पाणी साचून राहिल्याने नाल्यात वाहने पडल्याची घटना घडली आहे चिरनेर गावातील अंर्तगत रस्ते ही पाण्याखाली गेल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. एकंदरीत उरण तालुक्यात दमदार पडणाऱ्या पावसामुळे जनजीवन विस्कळित झाले आहे.

# भाजप नेते किरीट सोमय्या यांच्या विरोधात शिवसेना पक्षाच्या उरण महिला आघाडी आक्रमक



**दै.रायगड नगरी । उरण**

भारतीय जनता पार्टीचे नेते किरीट सोमय्या यांचे लोकशाही टीव्हीने जे पोलखेल करून वादग्रस्त व्हिडिओ महाराष्ट्राच्या जनते समोर आणले आहेत त्या विरोधात संपूर्ण महाराष्ट्रात महिलांमध्ये जनोक्रोश निर्माण झालेले आहे, आणि त्याचाच भाग म्हणून शिवसेना उरण तालुका व शहराच्या महिला आघाडीच्या वतीने जिल्हाप्रमुख माजी आमदार मनोहरशेठ भोईर, उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर, गटनेते गणेश शिंदे व उपजिल्हा संघटिका ममता पाटील यांच्या नेतृत्वाखाली उरण पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम यांना निवेदन सादर करून पुढील कारवाई करण्याची विनंती केली आहे.

सदर वेळी महिला आघाडीच्या तालुका संघटिका भावना म्हात्रे, विधानसभा संघटिका ज्योती म्हात्रे, शहर संघटिका मेघा मेस्त्री, शहर संपर्क संघटिका वंदना पवार, उपतालुका संघटिका मनीषा ठाकूर, अल्पसंख्यांक सेलच्या शहराध्यक्ष मुमताज भाटकर, तालुका उपाध्यक्ष रुबीना कुट्टी, विभाग संघटिका रूपा सिंग, महिला आघाडीच्या पदाधिकारी जागृती घरत, हसीमा सरदार, मालिनी वायदांडे, मानसी पुरो, सुनीता गाडे, रश्मी घरत,रूपा पवार, कल्पना थळी, मा शहर संघटक महेश वर्तक, सम्राट घरत व कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# पळस्पे उड्डाणपुलाखाली रस्त्याची चाळण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील पळस्पे गावाच्या उड्डाण पुलाखाली सर्व्हिस रोड वर मोठ-मोठे खड्डे पडले आहेत.

त्यामुळे येथे सतत अपघात होत आहेत. त्याचप्रमाणे या रस्त्यावरून शाळकरी विद्यार्थी ये जा करत असतात. भविष्यात कोणतीही दुर्घटना होऊ नये म्हणून संबंधित प्राधिकरणाने योग्य ते उपाय करण्याची मागणी नागरिक करीत आहेत.

मुंबई गोवा महामार्ग रुंदीकरणाच्यावेळी पळस्पे गावाजवळ उड्डाणपूल उभारला गेला पण त्याचवेळी पावसाळी पाण्याचा निचरा न केल्यानं उड्डाणपुलाखाली सतत पाणी साठत आहे. त्यामुळे साथीचे रोग पसरण्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

त्यातच सेवा रस्त्याची अक्षरशः चाळण झाल्यामुळे शालेय विद्यार्थीयांसह नागरिकांना जीव मुठीत घेऊन ये जा करावे लागत आहे. या संदर्भात पळस्पे ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच चंद्रकांत भोईर व ग्रामविकास अधिकारी यांनी अनेकदा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभाग कार्यालयाशी सतत पत्र व्यवहार करूनही आजवर आमच्या तक्रारीची दखल घेतली नसल्याचे सांगितले. तरी लवकरात लवकर दखल न घेतल्यास ग्रामस्थ आंदोलन करतील असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# शेकापचे विलास फडके यांचा वाढदिवस विविध कार्यक्रमांनी संपन्न



**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्हा परिषदेचे विहिघर येथील माजी सदस्य विलास नारायण फडके यांचा वाढदिवस १५ जुलै व १६ जुलै रोजी आयोजित करण्यात आलेल्या लोकाउपयुक्त विविध उपक्रमांद्वारे परिसरात साजरा करण्यात आला. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

माजी सभापती काशिनाथ पाटील यांनी शेतकरी कामगार पक्षाचा सर्वात लाडका कार्यकर्ता विलास फडके असल्याचे सांगितले तर माजी आमदार बाळाराम पाटील यांनी विलास फडके यांनी ठेवलेल्या उपक्रमांचे कौतुक केले. १५ जुलै रोजी करुणेश्वर वृद्धाश्रम भानघर, स्नेह कुंज आधारगृह वृद्धाश्रम नेरे तसेच शील आश्रम वांगणी येथे अन्नदान करण्यात आले. नागरिकांसाठी आरोग्य शिबिर, मोफत डोळे तपासणी व चष्मा वाटप, मोफत छत्री वाटप, अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना मोफत गणेश वाटप व शासन आपल्या दारी योजना राबवण्यात आल्या. याचा शेकडो नागरिकांनी लाभ घेतला. राजीप शाळा विहिघर सभागृह सुशोभीकरणाचे उद्घाटन करण्यात आले. तर १६ जुलै रोजी ग्रुप ग्रामपंचायत चिपळे हद्दीतील भोकरपाडा, बोनशेत, चिपळे, कोप्रोली येथे वृक्षारोपण करण्यात आले.

विहिघर येथे बोरवेल ते स्मशानभूमी पाईपलाईन व पाण्याची टाकी उद्घाटन, तलाव नूतनीकरण व सुशोभीकरणाचे उदघाटन करण्यात आले. यावेळी माजी आमदार बाळाराम पाटील यांच्यासह शेतकरी कामगार पक्षाचे माजी सभापती काशिनाथ पाटील, माजी नगर-सेवक गणेश कडू, नामदेव शेठ फडके ,अनिल फडके, महेंद्र भगत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### नागोठणे पोलिसांची दमदार कामगिरी

# दर्ग्यातील दानपेटीतून रोख रक्कम चोरणाऱ्या सराईत चोरट्याला अटक

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

**नागोठण्यातील मुस्लिम समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या येथील मुख्य रस्त्यावरील हजरत मीरा मोहीद्दीन शाहबाबा दर्ग्यातील दानपेटीचा कुलूप तोडून अंदाजे दोन हजार रुपये रोख रक्कम चोरुन नेत अज्ञात चोरट्याने पोबारा केला होता. दि. १७ जुलै रोजी रात्री १ वाजण्याच्या सुमारास काळोखाचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने दर्ग्यातील दानपेटीवर डल्ला मारला. मात्र नागोठणे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदिप पोमन यांच्या मार्गदर्शनाखाली सीसीटीव्ही फुटेजच्या सहाय्याने मिळालेल्या माहितीच्या आधारे नागोठणे पोलीसांनी दि. १८ जुलै रोजी यातील आरोपीला काही तासांतच बेड्या ठोकल्या.**



यासंदर्भात नागोठणे पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार दि. १७ जुलै रोजी रात्री १ वाजण्याच्या सुमारास नागोठणे मुख्य रस्त्यावरील मुस्लिम समाजाच्या दर्ग्यात काळोखाचा तसेच पावसाचा फायदा घेत अंगावर काळ्या रंगाची पॅन्ट तसेच चेहरा दिसू नये यासाठी तोंडाला संपूर्णपणे काळ्या रंगाचा कपडा बांधून आलेल्या अज्ञात चोरट्याने दर्ग्यातील दानपेटीचा कुलूप दांडा नसलेल्या टिकावाच्या सहायाने तोडून अंदाजे दोन हजार रुपये रोख रक्कम चोरुन नेले. या प्रकरणी नागोठणे खान मोहल्ला येथील हिदयातुल्ला अधिकारी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नागोठणे पोलीसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दरम्यान काही दिवसांपूर्वी घडलेल्या मोबाईल चोरी प्रकरणातील आरोपी, महिला अत्याचार प्रकरणातील आरोपी असेल यांना काही तासांतच जेरबंद करणारे तसेच नागोठणे पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारल्यापासूनच उत्तमोत्तम कामगिरी बजावणाऱ्या सपोनि संदिप पोमन यांच्या मार्गदर्शनाखाली पोह संतोष म्हात्रे व पोह एम.के.रुईकर यांनी सीसीटीव्ही फुटेजच्या सहाय्याने मिळालेल्या माहितीच्या आधारे तसेच ज्या पद्धतीने चोरी करण्यात आली त्याच पद्धतीने याआधी पेण पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरी झाली असल्याचे समजल्यानंतर नागोठणे पोलीसांनी अधिक गतीने तपास करीत दि. १८ जुलै रोजी आरोपी गुरुनाथ तुकाराम वाघमारे याला पेण तालुक्यातील निगडावाडी येथून अटक करण्यात आली. आरोपी गुरुनाथ तुकाराम वाघमारे याच्यावर याआधीही पेण पोलीस ठाणे, दादर सागरी पोलीस ठाणे तसेच पनवेल पोलीस ठाणे याठिकाणी चार गुन्हे दाखल असल्याचेही पोलीसांनी सांगितले.

नागोठणे पोलीसांच्या या कौतुकास्पद कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत असतानाच अतिशय कमी वेळात या प्रकरणी आरोपीला जेरबंद केल्याने सपोनि संदिप पोमन तसेच पोह संतोष म्हात्रे व पोह एम.के. रुईकर यांच्यासह नागोठणे पोलीसांचे येथील मुस्लिम बांधवांनी कौतुक करत आभार मानले.

# रानसई धरण अखेर ओव्हर फ्लो : उरणकरांची चिंता मिटली

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील दोन लाख नागरिकांना पाणी पुरवठा करणारे रानसई धरण मंगळवारी (दि१८) पहाटेच्या सुमारास ओव्हर फ्लो होऊन वाहु लागले आहे.मागील काही दिवसांपासून कोसळणारे आणि डोंगर माथ्यावरून येऊन थेट धरणात मिळणाऱ्या पावसाच्या पाण्यामुळे धरण दुथडी भरून वाहु लागले आहे. मागील वर्षी १८ जुलै रोजी धरण पूर्ण भरले होते.यावर्षी ही १८ जुलै रोजी धरण पूर्ण क्षमतेने भरले असल्याची माहिती उरण एमआयडीसी कडून देण्यात आली आहे.

उरण तालुक्यातील २५ गावे,उरण शहर आणि ओएनजीसी ,एन ऐ डी सह इतर औद्योगिक विभागासह सुमारे दिड लाख लोकसंख्येच्या उरण परिसराला रानसई धरणातुन पाणी पुरवठा केला जातो.जुन महिना जवळपास पुरता कोरडाच गेला होता.

पावसाने पुन्हा दडी मारल्यामुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.मात्र त्यानंतर जुलै महिन्याच्या सुरुवाती पासुनच धरणक्षेत्रात कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे पाण्याच्या पातळीत सातत्याने वाढ होत चालली होती. त्यातच डोंगर माथ्यावरून येऊन थेट धरणात मिळणाऱ्या पावसाच्या पाण्यामुळे मंगळवारी ( दि१८) पहाटे ४ च्या सुमारास धरण दुथडी भरून वाहू लागले आहे.

त्यामुळे उरणकरांची पाणी टंचाईचे संकट दूर झाले असल्याची माहिती उरण एमआयडीसी कडून देण्यात येत आहे .

# मुरूड तालुक्यात मुसळधार पाऊस ; बत्ती वारंवार गुल

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरूड तालुक्यात गेल्या तीन दिवसापासून धुवांधार पाऊस पडत असून या मुळे जनजीवन अस्तव्यस्त झाले आहे. मंगळवारी देखील पावसाचा जोर कायम असून एकाच दिवसात ८४ मिमी पाऊस पडला आहे, तर आता पर्यंत एकूण १०१६ मिमी पावसाची नोंद झाल्याची माहिती तहसील सूत्रांनी दिली.

मुरूड परिसरात दररोज विजेचा खेळखंडोबा सुरू असून सकाळ, संध्याकाळी बत्ती गुल होत असल्याने मुरुडकर हैराण झाले आहेत. पावसाळ्यात रोज बत्ती गुल चा प्रकार प्रत्येक वर्षी मोठ्या प्रमाणावर होत असून या प्रकाराबाबत कोणत्याही प्रकारची ठोस उपाययोजना झालेली नसून दिवसेंदिवस हा प्रकार वाढता आहे.

यामुळे विद्युत ग्राहकांना खूप नुकसान आणि मनस्ताप सहन करावा लागत आहे. मंगळवारी दुपारी वादळी पावसाने अनेकांची भंबेरी उडाल्याचे दिसून आले. सायंकाळी देखील पावसाची संततधार सुरूच आहे. पाऊस असूनही पावसाळी पर्यटकांचा शुकशुकाट दिसत आहे. एस टी बस सेवा मात्र सुरळीत सुरू आहे. रोज तीन-चार तास विद्युत पुरवठा खंडित राहत असल्याने व्यवहार ठप्प होत आहेत. २१ जुलै पर्यंत पावसाचा जोर कायम राहणार असल्याचे तहसील सूत्रांनी सांगितले.दिघी ते आगरदांडा जलवाहतुक सुरू आहे.

# सोमय्या व्हिडीओ प्रकरणः राज्य महिला आयोगाने घेतली दखल

**दै.रायगड नगरी । मुंबई**

भाजपाचे माजी खासदार किरीट सोमय्या यांची एक कथित आक्षेपार्ह व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने एकच खळबळ माजली आहे. सोमवारी ही व्हिडीओ क्लिप एका वृत्तवाहिनीने दाखवली. त्यानंतर याचे पडसाद उमटू लागले. या प्रकरणी भाजप नेते किरीट सोमय्या यांनी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांना पत्र लिहून चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्यानुसार, पोलिसांकडून या व्हिडिओ प्रकरणी तपास सुरू आहे. यामध्ये जवळपास ८ तासांच्या ३५ व्हिडिओ क्लिप व्हायरल झाल्या असल्याचे बोलले जात आहे. या प्रकरणाची आता राज्य महिला आयोगानेही दखल घेतली असून पोलिसांनी महत्त्वाचे निर्देश दिले आहेत.

भाजपा नेते किरीट सोमय्या यांचा आक्षेपार्ह व्हिडिओ माध्यमांवरून प्रसारित झाला आहे.विविध सामाजिक संस्थाकडून सदर व्हिडिओ बाबत महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयास विचारणा होत आहे. तरी उपरोक्त प्रकरणी चौकशी करून वस्तुस्थितीदर्शक अहवाल महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयास तात्काळ सादर करण्याचे निर्देश मुंबई पोलीस आयुक्तांना देण्यात आले आहेत, असे ट्विट करत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी या प्रकरणाची दखल घेतल्याचे स्पष्ट केले आहे.

# सुनेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी सासरच्या मंडळींविरोधात गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । रोहा**

लग्न झाल्यानंतर एक ते दीड महिन्यांनी पत्नीला वेगवेगळ्या कारणावरून मानसिक त्रास देऊन छळ, जाच करणाऱ्या पती, सासू, सासरे व नणंद विरोधात रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेतील आरोपी अद्याप फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

नाशिक जिल्ह्यातील गायकवाड वस्ती दुर्गाव मनमाड रोड येथील राहणारा या प्रकरणातिल आरोपी हा सद्या रोहा तालुक्यातील भुवनेश्वर येथील सहकार नगर सोसायटीत राहत असून त्याने दिक्षा नावाच्या २८ वर्षीय मुली बरोबर ६ फेब्रुवारी २०२२ रोजी लग्न केले. लग्न झाल्यानंतर एक ते दीड महिन्यानंतर पती किरण शेजवळ हा आपल्या पत्नीला वेगवेगळ्या कारणावरून मानसिक त्रास देऊन विनाकारण लाथा बुक्क्याने मारहाण करत असतं. या दरम्यान त्याने पत्नीच्या उजव्या हाताचे बोटे मोडून तीला शारीरिक इजा केली.

माहेरच्या लोकांना शिवीगाळी करून पत्न-ीला मारण्याची धमकी दिली. त्यानंतर सासरे , सासू , नणंद यांनी संगणमत करून पीडित महिले सोबत वैवाहिक जीवन जगणे असहाय करण्याच्या उद्देशाने नवऱ्याला भडकावून विवाहितेला मानसिक त्रास दिल्याने घरातील या चौघा आरोपी विरोधात शारीरिक व मानसिक त्रास देणे, शिवीगाळी व मारहाण करण्याची धमकी देणे इत्यादी कलमानुसार गुन्हा दाखल केला आहे.